आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरीचिंचवड
पोलीस आयुक्तालय, चिंचवड, पुणे
फोननंबर- (020) 26209157
pieow.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट ता.२१/०३/२०२२

## इन्फीनॉक्स कॅपीटल कंपनीच्या शेअर ट्रेडींग ब्रोकर कंपनीचे ॲपवर बनावट व खोटा इलेक्ट्रानिक अभिलेख तयार करुन गुंतवणुकदारांची फसवणुक करणा-यांस अटक

**दिनांक ०१/०९/२०२१ ते दिनांक २७/०१/२०२२ या कालावधी पर्यंत ऑफीस नंबर-५०१,५ वा मजला, रेनबा प्लाझा, स्पॉट १८ मॉल जवळ, पिंपळे सौदागर पुणे** येथे तक्रारदार महेश मुरलीधर शिंदे वय-४४ वर्षे धंदा-व्यवसाय रा.फ्लॅट नं.३०४ बि विंग चारभुजा क्लासीक सेक्टर नं.१ इंद्रायणीनगर भोसरी पुणे यांनी इन्फीनॉक्स कॅपीटल कंपनीच्या शेअर ट्रेडींग ब्रोकर कंपनीमध्ये गुंतवणुक केलेल्या रक्कमेवर कंपनीचे डायरेक्टर आरोपी नामे **१)जय मावजी २)निजय मेहता, ३)निकुंज शहा, ४) निलेश शांताराम वाणी** यांनी फिर्यादी याना दरमहा फायदा करुन देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी यांनी गुंतवणुक केलेल्या रक्कमेवर फिर्यादी यांना दरमहा कोणतीही रक्कम दिली नाही. तसेच फिर्यादी यांनी गुंतवणुक केलेल्या रक्कम परत न देता कंपनीच्या मेटा ट्रेडर फोर या ॲपवर बनावट व खोटा इलेक्ट्रानिक अभिलेख तयार करुन फिर्यादींची व इतर लोकांची एकुण- ८,२९,७५,८०३/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी वरील आरोपी विरुध्द फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा दाखल होवुन देखिल इन्फीनॉक्स कॅपीटल कंपनीचे ऑफिस **क्रिस्टल होम्स, दुसरा मजला, डी/२०१, चंद्रभागा कॉर्नरजवळ रावेत,पुणे येथे कामकाज चालु असुन** आर्थिक गुन्हे शाखेकडील **पोलीस निरीक्षक व्ही.एस.धुमाळ, पोलीस उप निरीक्षक समिर दाभाडे व आर्थिक गुन्हे शाखा व सायबर शाखेकडील टिम तयार करुन नमुद** ठिकाणी जावुन खात्री केली असता सदर ठिकाणी इन्फीनॉक्स कॅपीटल कंपनीतील संचालक व इतर यांचेवर गुन्हा दाखल झाल्याचे माहित असुन देखील इसम नामे **सागर संजय जगदाळे, वय २८ वर्षे, रा.सी/४०१, साई प्लॅटीना, चंद्रभागा कॉर्नर, रावेत, पुणे हा इतर आरोपीसोबत मोबाईल व इलेट्रॉनीक माध्यमाव्दारे संपर्कात राहुन** इन्फीनॉक्स कॅपीटल मार्फत विविध लोकांची गुंतवणुकीव्दारे फसवणुक करत असताना टॅब, दोन मोबाईल,हवाला करीता वापरलेल्या १० रुपयाच्या चलनी नोटा बॅक पासबुक, बॅक चेकबुक व इतर कागदपत्रांसह मिळुन आल्याने सायबर शाखा येथील अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक सागर पानमंद यांचे मदतीने इलेक्ट्रॉनिक पुरावा गुन्हयाच्या अनुषंगाने ताब्यात घेवुन नमुद आरोपी यास दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

दाखल गुन्हयामध्ये आज पावेतो आरोपी **सागर संजय जगदाळे, वय २८ वर्षे, रा.सी/४०१, साई प्लॅटीना, चंद्रभागा कॉर्नर, रावेत, पुणे** याचेकडून **एकुण ८,५०,८००/- रुपयाचा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात इन्फीनॉक्स कॅपीटल कंपनीमार्फत फॉरेक्स ट्रेडींग व्दारे जास्त परतावा देतो असे सांगुन पिंपरी चिंचवड, पुणे व भारतातील नागरीकांची फसवणूक केल्याचे दिसत आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.कृष्ण प्रकाश यांचेकडुन नागरीकांना अहवान करण्यात येते की, फॉरेक्स ट्रेडींग, क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणुक करतान, आर.बी.आय. च्या नियमांची माहिती घ्यावी तसेच गुंतवणुकीचे रक्कम ज्या बॅक खात्यामध्ये पाठवित आहोत त्याची देखील पडताळणी करावी. योग्य ती खबरदारी बाळगावी व कोणत्याही अमिषाला बळी पडु नये.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त डॉ संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त गुन्हे, डॉ काकासाहेब डोळे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे डॉ प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ, सहायक पोलीस निरीक्षक सागर पानमंद, पोलीस उप निरीक्षक समिर दाभाडे, मंजुशा शेलार, सतेज जाधव, सहायक पोलीस फौजदार राजेंद्र शेटे, पोलीस हवालदार प्रमोद लांडे,सुनिल गवारी, अमित गायकवाड, प्रदिप वासाळे, संतोष चांदणे, नागेश माळी, पोलीस अंमलदार सिध्देश्वर सोनटक्के तसेच महिला पोलीस अंमलदार सानप यांचे पथकाने कली आहे.